# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०३/२०१७/01882 दिनांक- २०.०४.२०१७

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे**

| | |
|---|---|
| अपीलकर्ता | श्री. भोर दशरथ दत्तु,<br>८२६, रेणुका नगर,<br>नानेगाव रोड, देवळाली कॅम्प,<br>ता.जि. नाशिक मुंबई-४२२४०१. |
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | १७.०२.२०१७ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याची तारीख | ०३.०३.२०१७ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | २३.०३.२०१७ |

**<u>मागितलेली माहिती:-</u>**

१. दिनांक ३०/११/२०१५ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगा कडील पत्र ३५८२ ची झेरॉक्स प्रत मिळणे. पूर्ण माहिती दयावी. प्रकाशगड व्यवस्थापाकिय संचालक यांची पत्र मिळाले यांची सहिची झेरॉक्स दयावी. कृपया आपण दिलेली प्रत ही ११०६ ही ११/१२/२०१५ ची आहे हे कव्हरीग लेटर आहे हे प्रकाशगड यांना मिळालेले नाही. आपणांस आज पर्यत बरीच पत्रे पाठविली पण आपण उत्तर देत नाही असे दिसून येते (१) २४/११/२०१५ (२) २३/०२/२०१६ (३) ०९/०६/२०१६ (४) १४/०२/२०१७ ) ०९/०२/२०१६ माहिती अधिकार मा.अ.अ. १७/२०१७.

**<u>जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-</u>**

आपला दि. १५.०२.२०१७ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्य कार्यालयास दि. १७.०२.२०१७ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर अर्जात आपण उपस्थित केलेल्या माहितीस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपणांस आवश्यक असलेली माहिती खालीलप्रमाणे येत आहे.-

| अ.क्र. | तपशील | आभिप्राय/पुरविलेली माहिती |
|---|---|---|
| १. | दि. ३०/११/२०१५ MERC कडील पत्र Inward No. ३५८२ पत्राची झेरॉक्स १ प्रत मिळणे/देणे.<br>* आपण दि. ११/१२/२०१५ रोजी व्यवस्थापकिय संचालक यांना पाठविले पत्र ३५८२ यांची छायांकित प्रत मिळणेसाठी सदर अर्ज आपणाकडे पाठवित आहे. | आयोगाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या अभिलेख्यानुसार अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीचे दस्ताऐवज उपलब्ध असून सदर पत्राची छायांकित प्रत सोबत जोडली आहे (एकूण पृष्ठ १). |

**<u>प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-</u>** नमूद केले नाही.

आदेश (माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९ अंतर्गत) :-

संबंधित अपीलावर आयोगाच्या कार्यालयामध्ये दि. ११.०४.२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीत अपिलार्थी हे गैरहजर होते. माहिती अधिकारी यांनी आपले निवेदन सादर केले. प्रथमदर्शनी असे दिसून येते की, माहिती अधिकारी यांनी या कार्यलयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करून दिलेली आहे. माहिती अधिकारी यांच्या आदेशात हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नाही, करिता अपील निकाली काढण्यात येते.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

**निर्णय**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(अनिलकुमार उके)

**उपसंचालक (विधी) तथा प्रथम अपीलीय अधिकारी.**

**प्रत- जनमाहिती अधिकारी, मविनिआ.**